# मुख्य कार्यालय, विरार

विरार (पश्चिम),

ता.वसई, जि.पालघर - ४०१ ३०३.

दूरध्वनी : ०२५ - २५२५१०१ / ०२/०३/०४/०५/०६

फॅक्स : ०२५ - २५२५१०७

ई-मेल :vasaivirarcorporation@yahoo.com


जावक क्र. : व.वि.श.म./क्रीडा/६६/२०२४-२५

दिनांक : २९/०४/२०२४

## जाहीर आवाहन

प्रतिवर्षीप्रमाणे सामाजिक व धार्मिक उत्सव "गोपाळकाला" (दहिहंडी)मंगळवार, दिनांक 27 ऑगस्ट, 2024रोजी सर्वठिकाणी मोठ्या उत्साहाने साजरा केला जाणार आहे.गोविंदा पथक ह्या उत्सवात मोठ्या उत्साहाने भाग घेतात. दहिहंडी उत्सवात भाग घेणारे गोविंदा पथक आपले ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न प्रत्येक प्रसंगी किंवा उत्सवाच्या वेळी करीत असतात.उत्सवामधील जोखीम व धोका विचारत घेवूनगोविंदा पथकात भाग घेणा-यागोविंदा (खेळांडू) यांना विम्याचे संरक्षण देणेसाठी वसई विरार शहर महानगरपालिकेने गोपाळकाला अपघात विमा योजनेस मंजुरी दिली आहे. या योजनेअंतर्गत दहीहंडी पथकातील सर्व गोविंदांचा मोफत अपघात विमा काढण्यात येणार आहे.

तरी महानगरपालिका हद्दीतील सर्व गोविंदा पथकांनी महानगरपालिकेशी संपर्क साधून पथकात समाविष्ट गोपाळांचा विमा काढून या योजनेचा लाभ घ्यावा याकरीता जाहीर आवाहन करण्यात आले आहे.

## गोपाळकाला अपघात विमा सुरु करण्यासाठीची पुर्तता

1) नोंदणीकृत मंडळाचे/संस्थेचे नाव ------------------------------------------------------------------------------------------
2) नोंदणीकृत मंडळाचा/संस्थेचा पत्ता ----------------------------------------------------------------------------------------
3) मंडळाचा/संस्थेचा नोंदणी क्रमांक ------------------------------------------------------------------------------------------
4) मंडळ प्रमुखाचे नाव व मोबाईल क्रमांक -------------------------------------------------------------------------------

| अ.क्र. Sr.no | गोविंदाचे पुर्ण नाव Full Name of Govinda | जन्म दिनांक (Date of Birth) | वय Age | आधारकार्ड क्रमांक Aadharcard no | नामनिर्देशीत (वारसाचे) नाव Beneficiary name | नाते Relationship | संपर्क क्रमांक Contact No |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

1) नोंदणीकृत मंडळाच्या लेटरहेडवर गोविंदाचे पुर्ण नाव, वय, जन्म तारीख, नामनिर्देशीत व्यक्तीचे नाव (वारसाचे नाव) व अनुषंगीक माहीतीची यादी टंकलिखीत करुन A4साईजपेपरवर दोन प्रतीत वसई विरार शहर महानगरपालिका, नविन प्रशासकीय इमारत, क्रीडा विभाग,चौथा मजला, यंशवत नगर रोड, विरार (पश्चिम) येथे जमा करावी.
2) 14 वर्षाखालील गोविंदांचा विमा काढला जाणार नाही.
3) विमा योजनेचा लाभ घेणेसाठी अंतिम तारिख शुक्रवार, दिनांक 16 ऑगस्ट 2024 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत राहील.
4) सर्व गोविंदा पथकांनी /मंडळांनी मुदतीत येवून विमा योजनेचा लाभ घेवून सहकार्य करावे.
5) गोपाळकाला (दहीहंडी) अपघात विमा योजनेचा लाभ घेण्यासाठी वसई विरार शहर महानगरपालिका, नविन प्रशासकीय इमारत, क्रीडा विभाग,चौथा मजला, यंशवत नगर रोड, विरार (पश्चिम) येथे भेट द्यावी.
6) गोविंदा अपघात विमा योजनेचा फॉर्ममहानगरपालिकेच्या vvcmc.inया वेबसाईट वर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

सही/-

(सदानंद पुरव)

उपआयुक्त, क्रीडा विभाग

वसई विरार शहर महानगरपालिका